

UNITE FOR GOOD

# अजिंठा

जुलै -२०२५ ● अंक-१ ला



आर.आय.प्रेसिडेंट
रो.फ्रान्सिस्को अरेइझो



डिस्ट्रीक्ट गव्हर्नर
रो.ज्ञानेश्वर शेवाळे



प्रेसीडेंट
रो.गिरीश कुलकर्णी



ऑन.सेक्रेटरी
रो.सुभाष अमळनेरकर



बुले.कमिटी चेअरमन
रो.कॅ.मोहन कुलकर्णी

Rotary | UNITE FOR GOOD

ROTARY CLUB JALGAON

R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26
Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

रोटरी वर्ष २०२५-२६ चा आपले बुलेटिन अजिंठाचा पहिला अंक सादर करतांना अतिशय आनंद होत आहे. सर्व प्रथम अजिंठाच्या संपादकत्वाची माझ्यावर जाबदारी सोपवल्याबद्दल मी आपले अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांचा आणि आपल्या क्लबचा ऋणी आहे. त्याच प्रमाणे या आधी अजिंठाच्या संपादिका रो.स्वाती ढाके यांनी गेली पाच वर्षे अतिशय उत्कृष्टपणे ही जबाबदारी सांभाळली. याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्यांनी नवनवीन सदर यात सामील केले, अंक नेहमीच माहितीपूर्ण आणि वाचनीय होईल याकडे लक्ष पुरवले आणि दर महिन्याच्या बरोबर १ तारखेला सकाळी सकाळीच आपल्याला सादर केला. खरंच कौतुकास्पद कामगिरीच म्हणावी लागेल.

यावेळी सुद्धा अजिंठा, जे आपल्या क्लबचे मुखपत्र आहे त्यात नवनवीन माहिती, रोटरी डिस्ट्रीक्ट बद्दल व त्याही वरील पातळीवर होणाऱ्या घडामोडी, तसेच आपल्या क्लब मधील ॲनेटस् यांनी त्यांच्या प्राप्त केलेल्या यशाबद्दल सुद्धा आपण ओळख करून घेणार आहोत. असे बरेच स्वागतार्ह बदल आपणास यावेळी दिसतील. जॉन केनेडींनी म्हटलेच आहे 'Change is the Law of Life. And, those who look only to the past or present are certain to miss the future.'

रोटरी इंटरनॅशनलच्या अध्यक्षांच्या Unite For Good या संदेशानुसार आपण एकत्र येऊन बदलाला सामोरे जाऊन समाजहिताचे महान कार्य करू या. या अंकाबद्दल आपली प्रतिक्रिया/अभिप्राय जरूर कळवा. धन्यवाद !

**- रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

रोटरी प्रणाम !

रोटरीच्या नवीन वर्षाची सुरुवात १ जुलैपासून होत आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने व पाठबळावर अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारताना मनात कृतज्ञता व प्रेरणेची जाणीव आहे. आपण सर्वांनी मिळून हा रोटरी वर्षाचा प्रवास अर्थपूर्ण, लोकाभिमुख आणि समाजमन जपणारा करायचा आहे.

'युनाईट फॉर गुड' या रोटरी इंटरनॅशनलच्या अध्यक्षांच्या संदेशानुसार आपण एकत्र येऊन समाजहिताचे कार्य करणार आहोत. रोटरीचे सात फोकस एरियाज आपले कार्यक्षेत्र राहील आणि त्यातच आपल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे मूळ असेल.

इ.६ वीच्या अप्रगत विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचा आत्मविश्वास, चारित्र्य आणि भविष्य घडवण्याचा संकल्प साकारणारा आरआयपीई प्रकल्प, समाजाची वैचारीक प्रगल्भता वाढविणारा रोटरी वाचन कट्टा व ऑनलाईन तसेच ऑफलाईन रोटरी व्याख्यानमाला, विविध सामाजिक विषयांवरील कार्यशाळा, यासह अनेक संकल्प मनात आहेत. तसेच PEACE वरील अभ्यासक्रम एक मैलाचा दगड ठरेल असा विश्वास आहे. क्लब सदस्यांच्या कल्याणासाठी उपयुक्त अशा उपक्रमांना आपण प्राधान्य देणार आहोत. निधी उभारणीसाठी कॉफी टेबल बुकची संकल्पना साकारत आहोत.

नानाविध फेलोशिप प्रोग्राम्सद्वारे आपल्यातील बंध अधिक दृढ करूया ! आपण काम करताना मी पेक्षा आपण आणि क्लबपेक्षा समाज या दृष्टिकोनातून पुढे जाणार आहोत. सर्वसमावेशकता (Inclusion), समता (Equity) आणि विविधता (Diversity) या मूल्यांना मान देत, आपला क्लब हा रोटेरीयनस् साठी नव्हे तर समाजासाठी आदर्श संस्था बनेल, अशी माझी ठाम श्रद्धा आहे.

या वर्षीचे स्वप्न हे केवळ माझे नाही ते आपले आहे. चला, आपण सर्वजण मिळून हे स्वप्न वास्तवात उतरवू या !

**- रो.गिरीश कुलकर्णी**

साप्ताहीक सभा

# जून महिन्यातील साप्ताहिक सभा




✻ दि.८ जून २०२५ – रविवार रोजी आयोजित साप्ताहिक सभेत पी.डी.जी. महेश मोकलकर यांनी 'Innovations in Rotary Projects' या विषयावर खूप छान आणि उपयुक्त माहिती दिली. आपले रोटरी प्रोजेक्टस् जर आपण थोडी Creativity आणून Innovative पद्धतीने केलेत तर ते नक्कीच परिणामकारक आणि यशस्वी होतात असे त्यांनी त्यांच्या अनुभवातून खुमासदार शैलीतून कथन केले.

✻ दि.१३ जून २०२५ – शुक्रवार रोजी आयोजित साप्ताहिक सभेत जळगाव शहरातील इतर क्लबच्या अध्यक्षांना 'Reflections - The Echoes of Leadership' या विषयावर चर्चा करण्यासाठी आमंत्रित केले होते. यावेळी प्रेसिडेंट एन्क्लेव्हचे चेअरमन पीपी किशोर सुर्यवंशी, रो.विनित जोशी–अध्यक्ष रोटरी क्लब जळगाव वेस्ट, रो.दिनेश थोरात–रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल, रो.तुषार जाखेटे–रोटरी क्लब जळगाव गोल्ड सिटी, रो.वर्षा रंगलानी–रोटरी क्लब जळगाव रॉयल्स् आणि या बरोबर आपल्याही क्लबचे अध्यक्ष रो.डॉ.सागर चित्रे या सगळ्यांनी या चर्चासत्रात उत्साहाने भाग घेतला. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन रो.राजेश यावलकर यांनी उत्तमरितीने करून कार्यक्रम मोठा रंगतदार केला. सचिव रो.पराग अग्रवाल यांनी आभार प्रदर्शन केले.







✻ दि.२० जून २०२५ – शुक्रवार रोजी आयोजित साप्ताहिक सभेत या संपूर्ण वर्षात ज्यांनी भरीव कामगिरी केली. अशा सर्व कमिटी चेअरमन यांचे आभार मानून त्यांचा सत्कार केला. आणि हा सत्कार म्हणजे एखाद्या विद्यापीठात स्नातकांना पदवीदान समारंभात कसे गाऊन आणि टोपी घालून सन्मानपूर्वक पदवी दिली जाते. त्याचप्रमाणे आपल्याही सर्व कमिटी चेअरमन आणि इतर काही सभासद यांचा सत्कार आपल्या अध्यक्षांनी केला. प्रथमच हा नाविन्यपूर्ण सोहळा सगळ्यांना पहायला मिळाला. त्यामुळे वातावरण अतिशय उत्साही आणि आनंदी होते. सचिव रो.पराग अग्रवाल यांनी आभार प्रदर्शन केले.

## महीन्यातील सभा




✻ दि.२७ जून २०२५ – शुक्रवार रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही या वर्षाची शेवटची सभा होती आणि विषय होता 'Impressions of the Year' सुरूवातीस अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे यांनी त्यांच्या काळातील कामगिरीचा थोडक्यात आढावा घेतला व सर्वांप्रति आभार मानले. नंतर इतर अनेक सदस्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.

# जून महिन्यातील प्रोजेक्ट




✻ दि.१ जून २०२५ – रविवार रोजी आपल्या क्लबने 'Rotary Awarness And Leadership Development Seminar' हे एक चांगले सेमीनार आपल्याच रोटरी हॉल मध्ये आयोजित केले होते. यास आपल्या सदस्यांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. सेमिनारचे उद्घाटन प्रमुख पाहुणे – केशव स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भरत अमळकर यांच्या हस्ते झाले. यात वेगवेगळ्या विषयांवर आपल्यातील पीडीजी डॉ.चंद्रशेखर सिकची, पीपी प्रेम कोगटा व इतर रोटेरीयन्स्नी मार्गदर्शन केले.. रो.चंदन महाजन व रो.पराग अग्रवाल यांनी आभार प्रदर्शन केले. रो.रितेश जैन हे कन्व्हेनर होते.

✻ दि.३० जून २०२५ – सोमवार रोजी बहिणाबाई विद्यालय, जळगाव या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि पाणी पिण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले.





✻ दि.३० जून २०२५ – सोमवार रोजी बेळी, नशिराबाद येथील जि.प.शाळेत सर्व विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले.

## बॉलीवुड टाईम्स

रो.सुबोध सराफ



हो खरंय... राजी ..पण खूप वर्षांनी थिएटर म्हणजे मल्टिप्लेक्स मध्ये जाऊन पाहिलेला सिनेमा...गेली काही वर्ष. थिएटर मध्ये जाऊन सिनेमा बघण्याची मजा गेलीच मॅटनी शो अगदीं वेळेवर जाऊन ... बहुतेक वेळेला मारामारी करून ...तिकीट काढलेले आठवतंय ...पहिल्या दिवशी पिक्चर पाहण्याची ओढ काही औरच असायची ...अमिताभचा महान सिनेमा सकाळी सहाचा शो बघितला आहे.. हम किसीसे कम तर किती तरी वेळेला पहिला आहे ...सिनेमा सुरू झाला तरी .. शिट्या ...गोंधळ ..उशिरा येणारे चालू असायचं ...त्यात काही डायलॉग जायचे ..कधी तरी एखाद गाणं सुरवातीला असायचं...मुंबईला सुटी मध्ये जाणं व्हायचं तेव्हा. एक्सेलसिअर ..मेट्रो..ला दुरूनच पाहणे व्हायचे...एकदा कधी तरी आम्ही मित्र मुम्बई ला गेलो असताना चार्ली चॅप्लिन यांचा मॉडर्न टाइम्स आणि सिटी लाईट हे दोन सिनेमे पाहण्याचे भाग्य लाभले होते ..आणि टाटा एक्सपेरिमेंटल थिएटर मध्ये नसीरुद्दीन शाह बेंजामिन गिलानी आणि रत्ना पाठक यांचे नाटक पाहायला मिळाले होते. झू स्टोरी काही अविस्मरणीय प्रसंग आहेत..त्या पैकी हा एक..त्यावेळी सिनेमा पाहण्याची ओढ असायची ...उत्सुकता असायची ...एखाद गाणे ..डायलॉग चुकला पाहायचा तर पुन्हा तो सिनेमा पाहायला जाई...देव आनंद ..शम्मी ...राजेंद्र कुमार..जॉय मुखर्जी .हे कळले मॅटीनी शो मधूनच ..देव आनंद ..शम्मी ...मजा असायची गाणी तुफान ...पण बाकीच्यांना पहायचं म्हणजे शिक्षा वाटायची...एका थिएटर मध्ये खास रविवार चा हॉलिवूड पट असायचा ...दहा वाजता..खूप क्लासिकल हॉलिवूड सिनेमे तेव्हा पाहायला मिळाले...मॅकन्नास गोल्ड...एंटर द ड्रॅगन ...सायको...डायल एम फॉर मर्डर इत्यादि.... नटवर थिएटर मध्ये शोले २२ हफ्ते टिकून होता. सरगम १८ आठवडे..असे कित्येक सिनेमा ..मुक्काम ठोकून असायचे...ती सिनेमा पाहण्याची धडपड .. टॉकीज मधला गोंधळ ... इंटर मध्ये घेतलेले खारे शेंगदाणे...गाणे सुरू झाले की शिट्या ...प्रसंगी नाण्यांची उधळण...त्या पत्र्याच्या खुर्च्या... ते भारलेले वातावरण .... न फिरणारे पंखे...असह्य उकाडा...पण सगळे लक्ष सिनेमात...हे जे काही रसायन त्या काळतलं होत ना ..त्याची लज्जत ..वेगळीच ..होती ..आज च्या मल्टिप्लेक्स मधील चकचकीत वातावरणात ते गडप झाले आहे...इथली शांतता ..गंभीर चेहरे ....बेचव पॉपकॉर्न ...त्या गोंधळाची .. खारे दाण्याची मजा ...ऐन वेळी जाऊन तिकीट काढण्याची चढाओढ ..त्याची सर ...आज च्या या सिनेमाचा आत्मा हरवलेल्या मल्टिप्लेक्स मध्ये नाही हेच .... खरं...

## गोल्डन वर्डस्

# Book Review

रो.पंकज व्यवहारे



Why Book Reviews ----

If you Only Read the Books
That everyone Else Is Reading
You Can Only Think
What Everyone Else Is Thinking

By- Haruki Murakami

*(This Review will increase our pattern of thinking style, intelligence and wisdom)*

## Book : The Alchemist

Author: Paulo Coelho, Type: Fiction, Published in: 1988

Best Quotes in the book: When you want something, all the universe conspires to help you achieve it.

Review:

One must read this book so that he/she can understand how to follow dream and find out treasure of sharing, caring and learning in the path of life. The Alchemist by Paulo Coelho continues to change the lives of its readers forever. With more than two million copies sold around the world, The Alchemist has established itself as a modern classic, universally admired. It is classical literature and self-improvement guide

What happened with a young shepherd boy in Southern Spain. He always sees the same dream about a hidden treasure in Egypt, over and over again, which eventually leads him to investigate it. The book is full of curious and magical things that we must hunt for ourselves in our life. The boy teaches us we must have passion and desire to make our destiny into reality.

The book's core theme is destiny. This is combined with many mysterious characters and deep, thoughtful lessons, often in the form of riddles and puzzles. This book is an incredible drive to explore your own destiny.

About the Author

Paulo Coelho, born in Rio de Janeiro in 1947, is one of the bestselling and most influential authors in the world. The Alchemist, The Pilgrimage, The Valkyries, Brida, Veronika Decides to Die, Eleven Minutes, The Zahir, The Witch of Portobello, The Winner Stands Alone, Aleph, Manuscript Found in Accra, and Adultery, among others, have sold 150 million copies worldwide.

## रोटरी को जानो

## आपले आर आय प्रेसिडेंट रो. फ्रान्सिस्को अरेझ्झो, इटली



Francesco Arezzo of Italy has been selected as President of Rotary International for 2025 - 26. Francesco Arezzo, a member of the Rotary Club of Ragusa, Italy, has been selected by the Board of Directors to become Rotary International's President for 2025-26. The 2025-26 presidential message, announced at the 2025 Rotary International Assembly in February, will remain **Unite For Good**, which calls on Rotary members to be a force for unity in a world increasingly divided by politics, geography and ideology. Through service projects, Rotary brings together people of every background — across races, religions, and professions — in a shared mission.

## आपले डिस्ट्रीक्ट गव्हर्नर रो.ज्ञानेश्वर शेवाळे



आपण सर्वांनी संत ज्ञानेश्वरांचे नाव अनेकदा ऐकले आहे एक असे संत, ज्यांनी 'पसायदान' सारखा जगाला प्रथम सांस्कृतिक संदेश देणारा श्लोक दिला, आणि मानवी मूल्यांचा खरा अर्थ समजावून सांगितला. त्यांनी दाखवलेला मार्ग होता सामाजिक समता, संवाद, आणि सेवाभाव. कदाचित याच विचारांनी प्रेरित होऊन नानांच्या आईवडिलांनी त्यांच्या चेहऱ्यातच हे तेज, ही नम्रता आणि सेवाभाव पाहिला आणि त्यांचे नाव 'ज्ञानेश्वर' ठेवले. आज हे नाव संत ज्ञानेश्वरांइतकं महान असो नसो, परंतु रोटरी मधील कामात जेव्हा आपण नाना शेवाळे यांचं नेतृत्व पाहतो, तेव्हा त्यांच्या कृतीत, विचारात आणि सेवेत आपण त्या संत परंपरेची झलक नक्कीच पाहतो. नाशिकमधील रुंगटा हायस्कूल मधून शिक्षण घेत, उच्च गुणांनी कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये प्रवेश मिळवणारा हा विद्यार्थी आजही प्रामाणिकपणात पहिल्या क्रमांकावर आहे. संपूर्ण शैक्षणिक कारकिर्दीत, ते महाविद्यालयात टॉपर होते आणि पहिला क्रमांक पटकावायचे. ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्समध्ये संशोधन क्षेत्रात (आर ॲन्ड डी डिपार्टमेंट) अनुभव घेतल्यानंतर त्यांनी पारंपरिक व्यवसायात आधुनिकतेची जोड दिली. समर्थ ज्यूस सेंटर हा नाशिकमधील प्रसिद्ध आणि विश्वसनीय जूस ब्रँड आज त्यांच्यामुळेच कन्सिसटंसी आणि क्वॉलीटीचं प्रतीक बनलं आहे. रोटरीच्या शताब्दी वर्षी २००४ साली रोटरीत प्रवेश घेतल्यापासून, त्यांनी सतत नावीन्यपूर्ण आणि प्रभावी उपक्रम राबवले. प्रारंभिक वर्षांतच त्यांनी अनेक क्लब पुरस्कार मिळवले. २०१० साली नाशिक नॉर्थ या नव्या क्लबची स्थापना करून चार्टर सेक्रेटरी म्हणून जबाबदारी स्वीकारली. त्या क्लबने युवा सदस्यांची ओळख निर्माण करून, वेगळ्या पद्धतीने प्रकल्प राबवले – जसे की: नाशिक ते नागपूर पोलिओ जनजागृतीसाठी बाईक रॅली, झेप – दिव्यांग मुलांसाठीचा कार्यक्रम, कृत्रिम अवयव वितरण शिबीर, आदिवासी भागात उन्हाळ्यात पाण्याच्या टाक्या. त्यानंतर असिस्टंट गव्हर्नर,, डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी या पदांवर त्यांनी कार्य केले आणि आता ते २०२५–२६ साली रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० चे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर म्हणून सेवा देणार आहेत. नाना शेवाळे हे सामर्थ्य, सहकार्य आणि सेवा यांचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. त्यांचा विवाह अनुपमा यांच्याशी झाला असून, त्यांना दोन मुले आहेत – नेहा, ज्या अमेरिका येथे आय.टी. इंजिनिअर आहेत, आणि आकाश, जे 'समर्थ ज्यूस' चा वारसा पुढे नेत आहेत.

## आपले असिस्टंट गव्हर्नर



रो. डॉ. अपर्णा भट कासार यांनी २००७ मध्ये रोटरीत प्रवेश केला व त्या २०२० – २०२१ मध्ये रोटरी क्लब जळगाव सेंट्रलच्या अध्यक्षा होत्या. तसेच त्यांनी समिती प्रमुख म्हणून Cultural Bulletin New Generation, Vocational Basic Education, Rotary International Membership, Community Non Medical इत्यादी मध्ये उत्कृष्ट काम केले. त्या गेल्या ४ वर्षांपासून डिस्ट्रीक्ट ऑफीसर असून त्या PHF सुद्धा आहेत. त्यांचे महत्त्वाच्या प्रोजेक्ट पैकी जीएमसी मध्ये १०७ बेड साठी ऑक्सीजन पॉईंटस् काढून दिलेत. कोरोना रूग्णांसाठी जवळपास ६ ते ७ हजार लोकांना फायदा, जि.प. प्राथमिक कन्या शाळा येथील वर्ग रंगकाम (वेगवेगळी चित्र, अभ्यासक्रमातील घटक, दिशा इ. माहिती भिंतीवर रंगवून दिले) त्याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला.

# आपल्या क्लबचे अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी



रो.गिरीश कुलकर्णी हे आपल्या क्लबचे २०२५-२६ साठी अध्यक्ष आहेत. त्यांचे शिक्षण बीसीएम, एमसीएम असून त्यांना ३३ वर्षांचा व्यावसायीक अनुभव आहे. यात व्याख्याता, बँकींग व सामाजिक क्षेत्राचा समावेश आहे. सध्या जैन इरिगेशन सिस्टीम्स् लिमिटेड येथे कार्यरत आहेत.

ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद कार्यकर्ते, जळगाव तरूण भारतचे सचिव, जी.एच.रायसोनी इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या कॉलेज व्यवस्थापन समितीचे सदस्य होते. रोटरी क्लब जळगावचे २००९ पासून सदस्य, पर्यावरण, प्रोग्राम, लिटरसी, पब्लिक, इमेजसह विविध समित्यांवर काम केले आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये मानद सचिव म्हणून जबाबदारी. भारतीय शिक्षण मंडळ, क्रिएटिव्ह ग्रुपसह अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा संपर्क आहे.

# आपल्या क्लबचे मानद सचिव रो.सुभाष अमळनेरकर



रो.सुभाष अमळनेरकर हे गेली १४ वर्षे आपल्या क्लब मध्ये कार्यरत आहेत. त्यांचे शिक्षण एम.कॉम. (विथ डिस्टींक्शन इन कॉस्ट अकाऊंटींग) असे आहे. त्यांनी या काळात मुखत्यवे ग्रीटींग्स् कमिटी, एनव्हायरॉनमेंट कमिटी, अटेंडन्स कमिटी या कमिटींचे चेअरमन म्हणून उत्कृष्टपणे काम बघितलं आहे. ते यशस्वी व्यावसायीक असून गौरी एंटरप्राईजेस या त्यांच्या स्वत:च्या फर्म तर्फे ते ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर म्हणून नावारूपाला आले आहेत. ते मल्टीपल पॉल हॅरीस फेलो असून नेहमीच रोटरीच्या प्रोजेक्टस्‌ना सढळ हाताने मदत करीत असतात.

# आपल्या क्लबचे सचिव (संवाद) रो.पंकज व्यवहारे



रो.पंकज व्यवहारे हे २०१८ मध्ये रोटरीचे सदस्य झालेत. ते व्यवस्थापन पदव्युत्तर पदवीधर असून त्यांना १७ वर्षांचा उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव आहे. ते प्रमाणित एनएलपी प्रॅक्टीशनर, आयसीएफ प्रमाणित जीवन प्रशिक्षक आणि प्रमाणित मानसोपचार चाचणी व्यावसायीक आहेत. करिअर समुपदेश, जीवन कौशल्य प्रशिक्षण या क्षेत्रात त्यांचे उत्तम काम आहे. ते उत्कृष्ट करिअर काऊन्सलर असून त्यांच्या स्वत:च्या भगीरथ काऊन्सलिंग सेंटर मार्फत त्यांनी अनेकांना सेवा दिली आहे. त्यांनी चेअरमन म्हणून इंटरॅक्ट आणि सदस्य म्हणून रोटरॅक्ट, लिटरसी आणि ई-लर्निंग कमिटींचे काम बघितले आहे.

रोटरी मंथ निमित्ताने

# डेसीग्नटेड मंथ - माता व बालसंगोपन

**पी.पी. रो. डॉ. सतीश शिंदाडकर**



जुलै हा महिना 'माता आणि बाल आरोग्य महिना' म्हणून साजरा करतात. जगभरातील रोटेरियंस या रोटरी फाउंडेशनच्या महत्त्वपूर्ण क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करत असतात. रोटरी फाउंडेशनच्या अनुदानाद्वारे तसेच आपल्या स्वतःच्या फंडामधून रोटेरियंस माता आणि त्यांच्या मुलांसाठी आवश्यक वैद्यकीय सेवा देत असतात त्यांचा मुख्य उद्देश माता आणि त्यांच्या मुलांसाठी सर्व समावेशक प्रोत्साहनात्मक, प्रतिबंधात्मक, उपचारात्मक आणि पुनर्वसन सेवा प्रदान करणे जेणेकरून ते उच्च स्तरावरील आरोग्याचा लाभ प्राप्त करू शकतील असा असतो.

मातेच्या संदर्भात विचार केला असता गर्भधारणेच्या अगोदर, गर्भावस्थेत आणि प्रसूतीनंतर स्त्रीच्या आरोग्य सुविधेतील सर्व टप्प्यांचा समावेश होत असतो गर्भधारणेच्या अगोदर मातेचे आरोग्य उत्तम असणे आवश्यक आहे आणि त्या अनुषंगाने योग्य आहार, योग्य व्यायाम इत्यादीं द्वारे आपण रोटेरियंस चिकित्सा / मार्गदर्शन करू शकतो गर्भावस्थेमध्ये बाळाचे आणि मातेचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी विविध आहार घटक, योग्य वेळेला लोह आणि कॅल्शियम यांचा पुरवठा महत्त्वपूर्ण असतो तसेच यासोबतच सामाजिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहील याचा देखील विचार महत्त्वपूर्ण असतो प्रसुती योग्य सुविधांसह संपन्न व्हावी म्हणून देखील शासकीय, निमशासकीय आणि खाजगी वैद्यकीय सेवांचा लाभ महत्वपूर्ण असतो संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य – उन्नती – भरभराट स्त्रीवरच अवलंबून असते. रोटरी तर्फे पोषक आहार कीट दिले जातात. वेळोवेळी औषधेही दिले जातात.

प्रसुती काळामध्ये स्त्रीला विविध अवस्थेतून जावे लागते. अशा सर्व अवस्थेत रोटरी परिवार विविध कॅम्प द्वारे मार्गदर्शन करीतच असतो. गर्भ राहिल्यानंतर शरीरात होणाऱ्या अंतस्त्रावांच्या बदलांमुळे तीन महिन्यापर्यंत जवळपास प्रत्येक गर्भवती स्त्रीला थोड्या प्रमाणात उलट्या, छातीत जळजळ होणे, थकवा वाटणे, चक्कर, अस्वस्थता इत्यादी लक्षणे दिसतात. जेवणावरची वासना कमी होते तळणाचा वास सहन होत नाही इत्यादी हे सर्व नैसर्गिक असून त्यापासून काहीच त्रास नसतो असे त्या गर्भवतीस समजून सांगणे गरजेचे असते आणि अधिक त्रास असल्यास वैद्यकीय सल्ल्याद्वारे औषध उपचार रोटरीच्या विविध कंप द्वारे संचालित होत असतात. महिलांचे मधुमेह, रक्तदाब, दमा, हृदय, किडनीचे विकार, संधीवात इत्यादी विकारांवर मार्गदर्शन व रक्त तपासणी शिबीर घेण्यात येते.

बालकांसाठी जन्मानंतर मातेचेच दूध हा सर्वोत्तम आहार आहे त्याची बरोबरी अन्य कोणत्याही आहाराने होऊ शकणार नाही बालकास त्याच्या वयाच्या एक वर्षापर्यंत मातेचे दूध देणे आवश्यक असते त्यामुळे त्याच्या शरीराचे आणि मनाचे उत्तम पोषण होते यासाठी आपल्या क्लब मार्फत मदर मिल्क बँक तसेच पोषक आहार दिला जातो. शतावरी कल्प सारखी आयुर्वेदिक औषधी दिली जातात. जसे जसे बालक मोठे होत जाईल त्या अनुषंगाने आहारातील बदल त्याच्या मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक असणारे खेळ आणि अभ्यास इत्यादी महत्त्वपूर्ण असतात अशा प्रकारे माता आणि बालक यांचा शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सहभाग आपण रोटेरीयंस घेत असतो.

## उगवते तारे

# आई म्हणूनी...

रो.ॲन.सौ.शुभांगी यावलकर



आपल्या समाजात अजूनही अनेक ठिकाणी मुलींच्या शिक्षणाकडे दुय्यम दृष्टिकोन ठेवला जातो. मात्र आमच्या घरात सुरुवातीपासूनच शिक्षणाला प्रचंड महत्व... सासरे सरकारी नोकरीला तर सासूबाई दैनिकाच्या संपादिका, पतीही दैनिकाच्या कामात सतत व्यस्त असल्याने मुलांच्या शिक्षणाकडे मलाच लक्ष द्यावे लागले. घरातील कामे आणि स्वतः चे व्याप सांभाळून मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देतांना थोडी तारेवरची कसरत झाली मात्र शिक्षण हे वाघिणीचे दूध असल्याने त्यात तडजोड नाही हे मनाशी पक्के केले होते. त्यातून दोघंही मुले उच्च शिक्षित करण्याचे दृढनिश्चत केले. मुलगा पुष्कर हा कार्डिफ युनिव्हर्सिटी मधून एम.बी.ए.झाला आणि स्वतः ची  बिझनेस ग्रोथ कन्सल्टंट कंपनी सुरू केली त्या अंतर्गत अनेक मोठे मोठे ब्रँड सोबत एडवर्टाइजमेंट आणि फिल्म प्रोडक्शन चे काम तो उत्तमरीत्या करत आहे ...तसेच आमची आश्लेषा लहानपणापासूनच अतिशय हुशार होती. अभ्यास कर असे तिला कधी सांगावे लागले नाही. पहिले ते आठवी ती रुस्तमजी शाळेत पहिल्या पाचमध्ये पक्की असे. आठवीत असतांनाच तिला  आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी लखनौला जाण्याची संधी मिळाली. रुस्तमजी स्कूलच्या याजवीन मॅडम यांनी तिला ही संधी दिली. आणि तेथूनच परदेशाचे आकर्षण तिच्यात आले. या लखनो येथील जीओफेस्ट आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स मुळे तिचे संवाद कौशल्य वाढले. या कॉन्फरन्स मध्ये आशिया खंडातील सर्व देशांचे प्रतिनिधी समवेत तिचा संपर्क आला. जीओफेस या आंतरराष्ट्रीय परिषदेमधील तिचा सहभाग आम्हाला सुखावह वाटला. हे सर्व करीत असतांना तिचा अभ्यासाकडील कल कमी झाला नाही हे महत्वाचे! अनुभूती स्कूल मध्ये ११ वी व १२ वी तिने सायन्स घेतले. मायक्रोबायोलॉजी मध्ये तिला करिअर करायचे होते. तिचे डॉक्टर होण्याचे माझे स्वप्न होते; पण आश्लेषाची मुळीच इच्छा नव्हती. वडिलांनी तिला जे आवडेल त्यात करिअर कर अशी मुभा दिली; त्यामुळे ती स्वच्छंदी होती. मीही माझा तिने डॉक्टर होण्याचा हट्ट सोडून दिला. प्रेशर केले असते तर ती मेडिकलला गेली देखील असती मात्र मी तसे केले नाही. अनुभूती स्कूलमध्ये ती मिडिया हेड म्हणून ॲक्टीव होती. आश्लेषामध्ये सुरुवातीपासून लिडरशीप करण्याचा एक वेगळाच गुण होता. तिचे शिक्षक नेहमीच तिला त्यासाठी प्रोत्साहन देत होते. वक्तृत्व, संभाषणकौशल्य तिच्या ठायी होतेच! अनुभूती स्कूल मधील जवळपास सर्वच कार्यक्रमाचे अश्लेशाने उत्तमरीत्या नियोजन केले. दरम्यान शिक्षकांनी एकदा आम्हा दोघांना शाळेत बोलावून आश्लेषाच्या कला–गुणांबद्दल अधिकच माहिती दिली ती चंचल असून तिला लिडरशीपच्या क्षेत्रात प्रचंड संधी असल्याचे अधोरेखित केले. पत्रकारीता किंवा आर्टमध्ये तिने करिअर करावे असा शिक्षकांचा आग्रह होता. अश्लेशाने स्वत: त्यासाठी शाळेच्या कॉम्पुटर लॅबमध्ये काही तास बसून सरांच्या मार्गदर्शन खाली कॉलेज शोधणे, त्यासाठीचे मार्गदर्शन घेणे सुरु केले. दिल्ली, पुणे आणि गांधीनगर येथे इंटरनेशनल रिलेशन डिग्री मिळवता येईल असे  कॉलेज असल्याची तिला माहिती मिळाली. दिल्लीतील शिक्षण चांगले असले तरी नुकतीच निर्भयासारखी घटना घडून गेल्यामुळे आमचा दिल्ली येथील कॉलेजला विरोध होता. आश्लेषाने देखील हट्ट धरला नाही. पुणे पेक्षा गांधीनगर येथील पि.डी.ई.यु. कॉलेज उत्तम असल्याचे लक्षात आल्याने गांधी नगर येथे लिबरल आर्ट मध्ये प्रवेश घेण्याचे अखेर निश्चित झाले. सायन्समधून आर्टस्‌मध्ये प्रवेश घेण्याचे निश्चित झाल्याने माझा त्याला विरोध राहिला. तिचा सायन्समधील अभ्यास उत्तम होता. गुणही चांगले मिळाले होते, असे असतांना सायन्स सोडणे मला पटत नव्हते. आश्लेषाचा व वडिलांचा हट्ट असल्यामुळे मला माघार घ्यावी लागली. गुजरातमधील गांधीनगर येथील कॉलेजला आश्लेषा एकटी मराठी मुलगी; मात्र तिच्यातील कला–गुणांमुळे तिने गुजराती लोकांमध्येही वेगळीच क्रेझ निर्माण केली. दरम्यान पहिल्याच वर्षी तिने कोलेज मध्ये AISAAC  जॉईन केले. AISAAC ही विश्वातील मोठी लीडरशिप वाढवणारी युवा संस्था आहे. १२० देशातील युवकांचा सहभाग असलेल्या या संस्थेच्या माध्यमातून युवकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य होत असते. पहिल्याच वर्षी सर्वात कमी वयाची व्हाईस प्रेसिडेंट म्हणून तिला संधी मिळाली. गुजराथ मधील विशेषतः अहमदाबाद आणि गांधी नगर च्या विविध कॉलेज मधील मुलांना परदेशात प्रशिक्षणासाठी पाठविण्याच्या महत्वपूर्ण योजनेत आश्लेषाचा सहभाग होता. विद्यार्थ्यांचा व्हिसा मिळवून देण्याच्या प्रक्रियेत आश्लेषाचा सक्रीय सहभाग असे. एका विद्यार्थ्याचा श्रीलंकेतील व्हिसा संपल्याने मोठी अडचण निर्माण झाली होती. तो विद्यार्थी तिकडे भूमीगत होता. त्याला पुन्हा भारतात आणण्यासाठी संरक्षण यंत्रणेसोबत आश्लेषाचा संवाद झाला.

AISAAC  च्या माध्यमातून भारतभर वेगवेगळ्या राज्यांमध्ये झालेल्या विविध परिषदांमध्ये सहभागी होऊन नेतृत्व करण्याची आश्लेषाला संधी मिळाली.  दरम्यान शिक्षण घेत असताना समाजातील काही  बरोबर अश्लेशाची भेट घडवून आणली. जेणेकरून तिचे जे सुरु आहे ते उत्तम आहे आणि योग्य दिशेने सुरु आहे या बाबत आम्ही निश्चिंत आणि तिला प्रेरणा देत आहोत. यात शिरीष बर्वे, यजुर्वेद्र महाजन, जयदीप पाटील, सुरेशदादा जैन, गिरीश कुलकर्णी अशोकभाऊ जैन अतुलभाऊ जैन यांनी तिला प्रेरणा दिली. यजुर्वेद्र महाजन सरांनी तर् मी कलेक्टर व्हयनू या पुस्तकाचे लेखक राजेश पाटील यांची मुलाखत घेण्याची संधी आश्लेषाला दिली. वडिलांप्रमाणे तिलाही मोठ–मोठे अधिकारी, उद्योजक यांची भेट घेण्याची आवड आहेच. यातूनच विद्यापीठात एका कार्यक्रमाचे नियोजन करताना गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्रभाई पटेल यांची भेट घेवून त्यांच्याशी सविस्तर संवाद केला.

विद्यापीठात शिक्षण घेत असताना पहिल्या वर्षी श्रीलंका दुसऱ्यावर्षी चीन तर तिसऱ्या वर्षी अमेरिका USA येथील अंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग घेण्याची संधी मिळाली चीनमधील परिषदेत तिने सादर केलेल्या शोधनिबंधाची मोठी चर्चा झाली. नुकतीच USA वाशिंग्टन डीसी मध्ये जावून भारताचे प्रतिनिधीत्व करत शोधनिबंध सदर केला. कॉलेजमधून परदेशात जाऊन अंतर राष्ट्रीय परिषदेत उपस्थित राहण्यासाठी सलग तीनवर्ष शिष्यवृत्ती मिळवणारी आश्लेषा पहिली आणि एकमेव आहे. ही माझ्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. USA वाशिंग्टन डिसी मध्ये जाऊन विविध देशांच्या डॉक्टरेक्ट प्राप्त प्रतिनिधींसमोर शोध निबंध सादर करणे हा क्षण आमच्यासाठी आनंदी आनंद गडे असाच होता.  या साऱ्या प्रवासात आश्लेषाला डॉ. श्रीराम दिवी सर , डॉ. व्यंकटराम रेड्डी सर, दवे  यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले.  आश्लेषा अभ्यासात हुशार आहे. संघर्ष तिच्या डोळ्यांसमोर होता. तिने मेहनत केली, शिष्यवृत्ती मिळवली, आणि उंच भरारी घेत आता पर्यंत यश मिळवले. आता आश्लेषा शेवटच्या वर्षाला आहे. तिला  BA (Hon), B.A. I.R. & P.Ad. पदवी प्राप्त होईल. अश्लेशाने एक गोष्ट सिद्ध केली, शिक्षण हे फक्त पैशांवर नाही, तर इच्छाशक्तीवर चालते. जिद्दीमुळे ती केवळ शिक्षितच झाली नाही, तर तिच्या पिढीसाठी  एक आदर्श उदाहरण बनली.

आर्थिक साक्षरता

# स्वतःचे बजेट तयार करण्याची कला

रो. रविंद्र पाटील (सी.ए.)



पैसा वाचवला म्हणजे पैसा कमावला हे आपण अनेकदा ऐकतो. पण, प्रत्यक्षात अनेक लोक दरमहिन्याला चांगले उत्पन्न मिळवूनही आर्थिक संकटात सापडतात. याचे प्रमुख कारण म्हणजे बजेट न बनवणे. आजच्या धावपळीच्या युगात आर्थिक शिस्त आणि नियोजन म्हणजे यशस्वी आयुष्याची गुरुकिल्ली आहे.

बजेट म्हणजे काय? बजेट म्हणजे आपल्या उत्पन्नानुसार खर्च आणि बचतीचे नियोजन. म्हणजेच, आपल्याकडे जेवढे पैसे येतात त्यात राहून खर्च कसा करायचा आणि भविष्यासाठी किती बाजूला ठेवायचे, हे आधीच ठरवणे. बजेट हा आपल्या आर्थिक आरोग्याचा आरसाच आहे.

बजेट तयार करताना लक्षात ठेवायच्या मुख्य पायऱ्या

उत्पन्नाचे विश्लेषण करा – बजेट बनवायच्या आधी आपले उत्पन्न स्पष्ट करा. यामध्ये व्यवसायातून येणारे उत्पन्न, नोकरीतून मिळणारे वेतन, भाडे, साइड बिझनेस, बोनस किंवा इतर अनियमित उत्पन्न समाविष्ट करा. उत्पन्न दोन प्रकारचे असते: – निश्चित उत्पन्न महिन्याला नियमित येणारा पगार किंवा भाडे, – अनिश्चित उत्पन्न मिळाल्यास येणारे बोनस, कमिशन इ. – खर्चांचे वर्गीकरण करा, आपले सर्व खर्च दोन गटांत विभागा:

– गरजेचे खर्च अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, औषधे, वीजबिल, वाहतूक इ.

– अनावश्यक खर्च सिनेमे, फॅन्सी खरेदी, ऑनलाइन ऑर्डर्स, हॉटेलिंग इ.

बचत आणि गुंतवणूक निश्चित करा –'पहिल्यांदा स्वतःला पैसे द्या' हा अर्थशास्त्रातील एक अत्यंत उपयुक्त सल्ला आहे. म्हणजेच, खर्चाआधीच कमीत कमी उत्पन्नाचा २०% भाग बचतीसाठी बाजूला काढा. हे पैसे पीपीएफ, म्युच्युअल फंड, आरडी, निवृत्ती निधी किंवा इतर ठिकाणी गुंतवा.

दर महिन्याला आढावा घ्या – एकदा बजेट तयार केल्यावर दर महिन्याला त्याचा आढावा घ्या. कोणत्या खर्चात वाढ झाली? काही अनावश्यक गोष्टींवर पैसे गेले का? याचा अभ्यास करून पुढील महिन्याचे बजेट सुधारित करा.

बजेट तयार करताना उपयुक्त टिप्स –५०% गरजेच्या खर्चासाठी,–३०% इच्छेच्या खर्चासाठी –२०% बचतीसाठी

– क्रेडिट कार्डचा वापर जपून करा, कारण त्यातून अनावश्यक खर्च वाढतो.

– घरातील सर्व सदस्यांना बजेटमध्ये सहभागी करा, विशेषतः जोडीदार आणि मोठी मुले.

– महत्त्वाचे उद्दिष्टे ठरवा उदाहरणार्थ, २ वर्षांत मोटारसायकल घेणे, ५ वर्षांत घर, निवृत्तीनंतर सुरक्षितता इ.

बजेटचे फायदे– ✻ पैशांची जाणीव होते कुठे किती खर्च होतो, हे लक्षात येते. ✻ अनावश्यक खर्च कमी होतो गरज नसलेल्या खर्चांना आळा बसतो. ✻ बचत वाढते भविष्याच्या योजना प्रत्यक्षात आणता येतात. ✻ आर्थिक शिस्त वाढते आकस्मिक गरजांना सामोरे जाता येते. ✻ निर्णय घेणे सोपे होते गुंतवणूक, खरेदी, कर्ज याबाबतीत योग्य दिशा मिळते.

स्वतःचे बजेट तयार करणे ही केवळ आर्थिक बाब नाही, तर ती शिस्त, स्वावलंबन आणि जबाबदारीची प्रक्रिया आहे. प्रत्येकाने दर महिन्याला स्वतःचा आर्थिक आढावा घेणे आणि त्यानुसार भविष्याची योजना तयार करणे ही गरज बनली आहे. तुम्ही किती कमावता यापेक्षा, किती योग्यरीत्या खर्च आणि बचत करता, हेच तुमच्या यशस्वी आर्थिक जीवनाचे मोजमाप ठरते.

आजपासून बजेट बनवा आणि उद्याचा आर्थिक आत्मविश्वास कमवा!

## यश, निवड, अभिनंदन



* रो.डॉ.शशिकांत गाजरे यांना रोटरी क्लब जळगाव इस्ट तर्फे स्व.डॉ.प्रताप जाधव 'धन्वंतरी सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अभिनंदन !
* रो.पंकज व्यवहारे यांनी करिअर काऊन्सेलिंग या विषयातील एक महत्त्वाचे आणि मानाचे सर्टिफिकेट प्राप्त केले असून आता त्यांना करिअर मॅनेजमेंट प्रॅक्टीशनर म्हणून ICCI म्हणजेच इन्स्टिट्युट ऑफ करीअर सर्टिफिकेशन-इंटरनॅशनल या संस्तेतर्फे मान्यता प्राप्त झाली आहे. अभिनंदन !
* रो.हेमंत भंगाळे यांचे चिरंजीव प्रथमेश हेमंत भंगाळे याने BLS.LLB ही मुंबई विद्यापीठाची पदवी उच्चश्रेणीत उत्तीर्ण केली असून दिल्ली विद्यापीठातून Public Administration या विषयात BA HONS ही पदवी सुद्धा यशस्वीरित्या प्राप्त केली आहे. अभिनंदन !
* रो.डॉ.शमा सराफ यांनी IMR संस्थेत विद्यार्थ्यांसाठी रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट आयोजन केले. त्याबद्दल रेडक्रॉस संस्थेतर्फे त्यांचा मा.जिल्हाधिकारी श्री.आयुषप्रसाद यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. अभिनंदन !
* जळगावातील एका नामवंत संस्थेने पीपी. ॲड.प्रविणचंद्र जंगले यांना २५ जून १९७५ रोजी "लादली गेलेली आणीबाणी" या विषयावर भाषण देण्यासाठी आमंत्रित केले होते. त्याचप्रमाणे या आणीबाणी मध्ये आपले सदस्य रो.ॲड.श्रीकांत भुसारी हे तुरूंगवासात असल्याने शासनातर्फे त्यांचा ही सत्कार या प्रसंगी करण्यात आला. आपल्या या दोन्ही सदस्यांचे खूप खूप अभिनंदन !
* पीपी. डॉ.तुषार फिरके यांची डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी (OCV) या पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन !
* पीपी.रो.जितेंद्र ढाके यांची Chairman-President Enclave म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन !

---

## जुलै महिन्यातील आगामी कार्यक्रम

* ४ जुलै – शुक्रवार– श्रीमती स्मिता पाटील, वळसंगकर व्याख्यान, विषय – इलेक्ट्रॉनिक गॅझेटसचा माता बालकांवर होणारा परिणाम (शुक्रवार– फॅमिली मिटींग)
* ५ जुलै – शनिवार– पालक व शिक्षकांसाठी कार्यशाळा Well-being in Digital Age सकाळी ११ ते ४ (रोटरी सभागृह, गणपती नगर, शुल्क रू. १००/–)
* ५ जुलै – Interact Club Installation Ceremony सकाळी ९ वाजता
* १० जुलै – मंगळवार– RIPE प्रकल्पाची सुरूवात
* ११ जुलै (शुक्रवार)– रोटरी व्याख्यानमाला (ऑनलाईन)– How to file your own Salary Return रात्री ८ वाजता
* १३ जुलै (रविवार)– Club Assembly सकाळी ९.३० वाजता
* २० जुलै (रविवार)– Club Installation सकाळी ११ वाजता प्रमुख पाहुणे पी.आर.आय.पी. कल्याण बॅनर्जी (कस्तुरबा सभागृह, जैन हिल्स्, गांधी तीर्थ, जळगांव)
* २५ जुलै (शुक्रवार)– Budget Meeting (Business Meeting)